ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख २ ऑक्टोबर, १९५७ | अंक ४०

## विविध माहिती

**रत्नागिरी जिल्ह्यांत संशोधन-केंद्र**—चालू आर्थिक वर्षांत रत्नागिरी जिल्ह्यांत मुंबई सरकारनें आंब्याचें संशोधन करणारें एक केंद्र स्थापन करण्याचें ठरविलें आहे. जिल्ह्याच्या मध्य-भागांत ह्या कामासाठी २५ ते ५० एकर जागा निवडण्यांत येणार आहे. संशोधनकेंद्रासाठी सुमारें ४३,००० रुपये खर्च येणार आहे. भारतामधील विविध प्रकारच्या आंब्यांविषयीं संशोधन करण्यांत येईल.

**पाकिस्तानचें व्यापारी-मंडळ**—पूर्व युरोपांतील देशांशीं असलेले व्यापारी संबंध वाढविण्याच्या दृष्टीनें पाकिस्तान सरकारनें आपलें एक व्यापारी मंडळ तिकडे पाठविण्याचें ठरविलें आहे. हें मंडळ रशिआ, पोलंड, झेकोस्लोव्हाकिआ आणि युगोस्लाव्हिआ ह्या देशांचा दौरा करणार आहे. मंडळांत सरकारच्या प्रतिनिधी-खेरीज पाकिस्तानमधील सहा प्रमुख उद्योगपतींचाहि समावेश करण्यांत आला आहे.

**वसतिगृहासाठी ५० हजार रुपये**—मध्यप्रदेशांतील शहजापूर जिल्ह्यांत आगर ह्या ठिकाणीं सरकारचा गौळवाडा आहे. ह्या ठिकाणीं शाळा व कॉलेजमधील गुरांच्या विद्यार्थ्यांना व्यावहारिक शिक्षण देण्याचा सरकारचा मानस आहे. विद्यार्थ्यांची राहण्याची सोय करण्यासाठी ५० हजार रुपये खर्चून राज्य-सरकार एक वसतिगृह बांधणार आहे.

**फिनलंडच्या मार्कचें अवमूल्यन**—फिनलंडच्या सरकारनें मार्कचें अवमूल्यन केलें आणि त्याचबरोबर वस्तूंच्या किंमती १५ सप्टेंबरच्या पातळीवरच स्थिर राखण्याचा हुकूम काढला. ऑक्टोबर महिनाअखेर ह्याच किंमती राहणार आहेत. पश्चिम युरोपांतून माल आयात करण्याबद्दलचे नियम शिथिल करण्यांत आले आहेत. डॉलरच्या कक्षेंतील देशांकडून आयात करण्यावरील निर्बंध मात्र चालू आहेत.

**अन्नमलाई विद्यापीठाला मदत**—अन्नमलाई विद्यापीठाला दिल्ली येथील व्हीट लोन ॲडमिनिस्ट्रेशनकडून १०,००० डॉलर्सची मदत मिळणार आहे. ह्या मदतीचा उपयोग करून विद्यापीठ वर्कशॉपसाठी एक इमारत बांधणार आहे. अमेरिकेनें भारताला दिलेल्या गव्हाच्या विक्रींतून रक्कम दिली जाणार आहे.

**कोलंबोसाठी टेलिफोनची यंत्रसामुग्री**—कोलंबो शहरांत बसविण्यासाठी हंगेरीनें ऐनजिनसी बदलाच्या तत्त्वावर टेलिफोनची यंत्रसामुग्री देऊं केली आहे. ह्या यंत्रसामुग्रीची किंमत ४० लाख पौंड होईल. यंत्रसाहित्यांत स्वयंचलित एक्सचेंजचीहि सामुग्री आहे. कोलंबो शहराच्या सर्व गरजा नव्या यंत्रसाहित्यानें भागविल्या जातील. ह्यासंबंधीं उभयता देशांत लवकरच वाटाघाटी होणार आहेत.

**पाकिस्तानमधील उद्योगधंद्यांना मदत**—पाकिस्तानमधील खाजगी उद्योगधंद्यांना मदत करण्यासाठी जागतिक बँकेनें ४२ लाख डॉलर्सचें कर्ज मंजूर केल्याचें जाहीर केलें आहे. हें कर्ज पाकिस्तान क्रेडिट ॲंड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनला देण्यांत येईल. कॉर्पोरेशनमध्यें पाकिस्तानी, ब्रिटश, अमेरिकन व जपानी भांडवलदार सामील आहेत.

**काथ्याच्या सतरंजीला बक्षिस**—गेल्या मे महिन्यांत अमेरिकेंतील सीएटल शहरीं एक आंतरराष्ट्रीय व्यापारी प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. ह्या प्रदर्शनांत भारताच्या काथ्याविषयक बोर्डानें काथ्यापासून बनविलेला कांहीं माल पाठविला होता. त्यांपैकी काथ्यापासून बनविलेल्या एका सतरंजीला प्रदर्शनाच्या चालकांनीं बक्षिस दिलें आहे.

**कामगार पुढाऱ्यांचा इषारा**—ब्रिटनच्या ट्रेड युनिअन कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनीं ब्रिटिश सरकारनें बँकेचा व्याजाचा दर वाढवून कर्ज मिळणें अवघड केल्याबद्दल धोक्याचा इषारा दिला आहे. सरकारच्या ह्या धोरणानें बेकारी वाढेल आणि उद्योगधंदे थंडावतील; असें त्यांचें मत आहे. ट्रेड युनिअन कॉंग्रेसचे ८० लाख सभासद आहेत.

**जुनीं दुर्मिळ हस्तलिखितें**—ज्या लोकांच्या जवळ अगर संस्थांच्या जवळ जुन्या ग्रंथांचीं दुर्मिळ हस्तलिखितें असतील त्यांनीं तीं भारत सरकारला देणगीदाखल द्यावींत, अशी जाहीर विनंति करण्यांत आली आहे. जीं हस्तलिखितें देणगी म्हणून देण्यांत येणार नाहींत तीं किंमत देऊन घेण्याचीहि तयारी दाखविण्यांत आली आहे. देणगी म्हणून देण्यांत आल्यास अशा हस्तलिखितांची फोटोप्रत देणगीदाराला देण्यांत येईल.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## भोपाळच्या मराठी जनांच्या गरजा

### व्यापार-उदीम आदींची मोठी संधि

" नागपूरहून अनेक महाराष्ट्रीय मंडळी नोकरीप्रीत्यर्थ भोपाळला गेली आहेत. त्यांच्यापैकी एक माझा मित्र मला भेटला व भोपाळविषयीं बरीच माहिती त्यानें सांगितली. येथील महाराष्ट्रीय लोकांच्या सध्यांच्या गरजा काय आहेत हा आमच्या गप्पांचा मुख्य विषय होता.

### कष्टमय जीवन पण सुधारणेला वाव

" भोपाळचें एकंदरीत जीवन कष्टमय आहे असा माझ्या मित्राचा अनुभव आहे. त्यांत कांहीं बाबतींत सुधारणा करणें शक्य आहे व कांहीं गोष्टी सरकारच करूं शकतें. इकडून गेलेले बरेच लोक एकटेच गेले असल्यामुळें त्यांच्या जेवणाचे फार हाल होतात. रहाण्याचें ठिकाण गांवापासून लांब, तेथें खाणावळी नाहींत. चांगली महाराष्ट्रीय खाणावळ एकहि नाहीं. ज्या खाणावळी गांवांत आहेत त्यांत स्वच्छतेचा अभाव आहे. ही उणीव भरून काढणें शक्य आहे. ह्याकरितां येथील कांहीं व्यापारी मंडळींनीं त्यांत मन घालणें आवश्यक आहे.

### नोकरांचा अभाव

" भोपाळमध्यें मोलकरणी मिळत नाहींत. धोबी मुसलमानी पद्धतीनें कपड्याला खळ लावून घुतात व न्हावी मुसलमानी पद्धतीनें केस कापतात. नागपूर भागांतील न्हावी व धोबी तेथें गेल्यास त्यांना बरेंच काम मिळूं शकेल. आपल्याकडील किराणा दुकानासारखीं दुकानें तेथें नाहींत. १० किराण्याच्या वस्तु १० निराळ्या दुकानांत मिळतात. त्याचप्रमाणें शिंप्यांनाहि चांगलें काम मिळूं शकेल. मराठी शाळा तेथें अजून नाहीं. मराठी शाळा व हायस्कूल यांचीहि एक गरज निकडीची आहे. त्यामुळें अनेकांना आपलीं मुलें इतर शहरांत ठेवणें भाग पडलें आहे.

### दळणवळणाची भयंकर उणीव

" या शहरांत दळणवळणाच्या सोईची भयंकर वाण आहे. रस्ते चढउताराचे असल्यामुळें सायकलवर जाणें फारच त्रासदायक वाटतें. बसेस आहेत पण नियमित व पुरेशा नाहींत व या ठिकाणीं मोटार रिक्षा चालविणाऱ्यांस बरेंच काम मिळेल.

" यानंतरची मोठी गरज म्हणजे डॉक्टरांची ! त्या शहरांत हकीम फार; डॉक्टर थोडे. तेहि मुसलमान. त्यामुळें महाराष्ट्रीय डॉक्टरांना हें एक नवें क्षेत्र आहे. अशाप्रकारें, भोपाळला गेलेल्यांच्या गरजा लक्षांत घेऊन कोणी उद्योगधंदा केला तर त्यामुळें उभयतांना फायदा होऊं शकेल."

एका महाराष्ट्रीयाचें 'तरुण भारत'ला पत्र

---

**मध्यप्रदेशाला मदत**—नवा मध्यप्रदेश बनविण्यांत आल्यापासून राज्य सरकारला आर्थिक अडचणींना तोंड द्यावें लागत आहे. राज्याच्या मुख्य मंत्र्यांनीं मध्यवर्ती सरकारकडे आर्थिक मदत मागितली होती. मागणीचा विचार करण्यांत येऊन राज्य सरकारला मध्यवर्ती सरकारकडून ३ कोटी रुपयांचें कर्ज मिळणार आहे. कर्जाचा उपयोग राजधानीच्या सुधारणेसाठी व उत्पन्नांतील तूट भरून काढण्यासाठी करण्यांत येणार आहे.

**आसाममध्यें सिमेंटचा कारखाना**—आसामचें सरकार सदरपूर ह्या ठिकाणीं सिमेंटचा कारखाना काढण्याचा विचार करीत आहे. कारखान्यासाठीं लागणारा कोळसा जवळपास मिळण्यासारखा असून चुनखडीचा दगड मात्र कांहीं अंतरावरून आणावा लागेल. कारखाना निघाला तर निर्वासितांपैकीं पुष्कळ लोकांना रोजगार मिळूं शकेल.

**तापसरीची साथ न येण्याची शक्यता**—अमेरिकेचे सर्जन जनरल डॉ. बर्न दिल्ली येथें वृत्तपत्रकारांशीं बोलतांना म्हणाले कीं, आशिआंतील ज्या देशांतून तापाची साथ येऊन गेली आहे त्या देशांत ती पुन्हां येईलच असें नाहीं. डॉ. बर्न जागतिक आरोग्य संघटनेच्या परिषदेसाठीं हाँगकाँगला गेले होते.

**सायकल कारखानदाराचें निधन**—सुप्रसिद्ध ब्रिटिश कारखानदार सर एडमंड क्रेन आपल्या वयाच्या ७० व्या वर्षी निधन पावले. त्यांनीं हर्क्युलर्स सायकल कंपनीची स्थापना केली होती. त्यांच्या धंद्यांतील यशामुळें त्यांना 'बायसिकल किंग' असें टोपण नांव प्राप्त झालें होतें.


दसऱ्यापासून दिवाळीपर्यंत
खुमासदार साहित्याची अखंड मेजवानी देणारा

# किर्लोस्कर

मासिकाचा भव्य दिवाळी अंक
नुकताच तुमच्या भेटीस आला आहे.

★ १६० पानांच्या ह्या विशेषांकाची किंमत फक्त १॥ रुपया आहे.

महाराष्ट्रांतील ज्या नामवंत साहित्यिकांनीं ह्या खास अंकांत आपलें बहुमोल साहित्य दिलें आहे त्यांचीं नांवेंच ह्या अंकाच्या उत्कृष्टपणाची ग्वाही देतील.

★ विनोदी लेख ★ चित्तथरारक सत्यकथा ★ ५ विचारप्रवर्तक लेख
★ आठ निवडक लघुकथा — शिवाय – कविता, विनोदी चित्रें, इ.

वार्षिक वर्गणी फक्त ६ रुपये.

किर्लोस्कर प्रेस, किर्लोस्करवाडी

ह्या खास अंकाचे लेखक
★ पु. ल. देशपांडे ★ ना. ग. गोरे
★ महादेवशास्त्री जोशी
★ र. वा. दिघे ★ वि. स. खांडेकर
★ शांताराम ★ प्रा. शेजवलकर
★ डॉ. अ. वा. वर्टी ★ मा. रा. भागवत
★ गो. नी. दांडेकर ★ व्यंकटेश माडगूळकर ★ श्री. ज. जोशी
★ अं. शं. अग्निहोत्री
★ अॅडव्होकेट शांताराम भालेकर
★ मुकुंदराव किर्लोस्कर

★ यशवंत ★ ग. दि. माडगूळकर
★ कुसुमाग्रज ★ बा. भ. बोरकर
यांच्या सुरस कविता

★ प्र. ग. शिरूर
★ श्री. ना. कुलकर्णी
★ ग. ना. जाधव ★ वसंत
★ लचके
प्रभृतींचीं चित्रें व सजावट

# अर्थ

बुधवार, ता. २ ऑक्टोबर, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अमेरिकन वकिलाचें उद्बोधक भाषण

अमेरिकेचे भारतामधील वकील मि. एल्सवर्थ बंकर, ह्यांनीं इंडिआ–अमेरिका सोसायटीपुढें केलेल्या भाषणांत भारताच्या आर्थिक विकासासंबंधीं कांहीं महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, सामाजिक लोकशाही आणि राज्यघटनेचें मार्गदर्शन ह्यांच्या साह्यानें अमेरिकेनें विकासक्षम अशी अर्थव्यवस्था निर्माण केली आहे. त्यामुळें तेथें जवळ जवळ निवर्गीय समाज उत्पन्न झाला आहे. अमेरिकेच्या दीर्घ अनुभवापासून, मोठ्या सामाजिक व आर्थिक घडामोडींच्या उंबरठ्यावर असलेला भारत कांहीं गोष्टी शिकूं शकेल. दोन्ही देशांत संमिश्र अर्थव्यवस्था चालू आहे. अमेरिकेनें ज्याप्रमाणें आपणांस उपयुक्त अशी सामाजिक व आर्थिक घडी बसविली आहे त्याप्रमाणें भारतहि बसवूं शकेल. तथापि अमेरिकेंत यशस्वी ठरलेले सर्वच मार्ग भारतालाहि मानवतील असें नाहीं. पं. नेहरू ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें, भारतांत व नव्यानें स्वतंत्र झालेल्या देशांत राजकीय स्वातंत्र्य आधीं आलें. अमेरिकेंत व युरोपांतील देशांत आर्थिक स्वातंत्र्यानंतर राजकीय स्वातंत्र्य आलें. ह्याचा अर्थ असा कीं, आर्थिकदृष्ट्या अविकसित असलेल्या देशांतील लोकांच्या गरजा त्या भागविण्याचीं साधनें हातीं येण्यापूर्वी निकडीच्या झाल्या. त्यामुळें आर्थिक विकासाचा वेग व व्याप्ति ह्यांना विशेष महत्त्व आलें. भारतांत भांडवलाच्या संचयाची गति सापेक्षतेनें मंद आहे. त्यामुळें भांडवल गुंतविण्याच्या दिशेवर आणि आर्थिक विकासाच्या धोरणावर सरकारचें अमेरिकेंतल्यापेक्षा अधिक नियंत्रण असणें जरूरहि असेल. १८४० च्या सुमारास अर्थशास्त्रविषयक जीं तत्त्वें प्रचलित होतीं, तीं आधुनिक जगाला लागूं करतां येण्यासारखीं नाहींत.

## बंदरांच्या विकासासाठी कर्जाची मागणी

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत भारतांत परदेशांकडून बरेंच अवजड यंत्रसाहित्य आयात करण्यांत येणार आहे. त्याशिवाय नेहमींची मामुली आयात आहेच. ह्या गर्दीला तोंड देण्यास भारतामधील बंदरें अपुरीं पडत आहेत. बंदरांत आलेल्या बोटींवरील माल उतरून घेण्याची त्वरा करणें जरूर आहे. पण तें करण्यासाठी बंदरांची सुधारणा व विकास करणें आवश्यक आहे. भारत सरकारनें देशांतील प्रमुख बंदरांची सुधारणा करण्याची एक योजना आखली असून तिचा तपशील जागतिक बँकेकडे पाठविण्यांत आला आहे. ह्या योजनेसाठी ७९.९ कोटी रुपये खर्च येणार असून भारतामधील कलकत्ता, मुंबई, मद्रास, विशाखापट्टम, कांडला आणि कोचीन ह्या बंदरांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी ती आखण्यांत आली आहे. योजना पार पाडण्यासाठी ४० कोटी रुपयांचे विदेशी चलन लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. भारत सरकारतर्फे असें सुचविण्यांत आलें आहे कीं, वरील रकमेपैकी निदान निम्म्या रकमेचें विदेशी चलन तरी जागतिक बँकेनें कर्जाच्या रूपानें ताबडतोब मंजूर करावें. भारतामधील बंदरांतील बोटींची दाटी लक्षांत घेतां कर्ज शक्य तितक्या लवकर मिळविण्याची खटपट करण्यांत येत आहे. भारताच्या ह्या प्रयत्नांना यश येईल असें दिसत आहे. जागतिक बँकेनें बंदरांच्या एंजिनिअरिंगचा आपला तज्ज्ञ लवकरच पाठविण्याचें कबूल केलें आहे. भारतामधील प्रमुख बंदरांच्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी हा तज्ज्ञ कांहीं आठवडे घालविणार आहे. अभ्यास पूर्ण झाल्यावर तो जागतिक बँकेला आपला अहवाल सादर करील व नंतर चालू वर्षअखेर बँकेकडून कर्जाचा पहिला हप्ता मिळेल अशी अपेक्षा आहे.

## चहाच्या निर्यातींत चिंताजनक घट

जगांतील बाजारपेठांतून भारतामधील चहाची निर्यात घटूं लागल्याचें आढळून आलें आहे. इजिप्त, सूडान, केनिया, ह्यांसारख्या देशांतून भारताचा चहा बराच लोकप्रिय झालेला होता. परंतु आतां तशी परिस्थिति राहिलेली नाहीं. चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहींत उत्तर भारतामधून १३.५६ कोटी पौंड आणि दक्षिण भारतामधून ३.३ कोटी पौंड चहा परदेशीं पाठविण्यांत आला. गेल्या वर्षीच्या ह्याच कालखंडांतील आंकडे अनुक्रमें १८.३२ कोटी पौंड आणि ४.०४ कोटी पौंड असे आहेत. भारताच्या चहाचें मुख्य गिऱ्हाईक ब्रिटन आहे. ब्रिटननें कमी चहा घेतल्यामुळें निर्यातींत मुख्यतः घट झालेली आहे हें खरें. पण, इतर देशांतूनहि अशीच घट झाली आहे हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. ब्रिटनच्या खालोखाल अमेरिका भारताचा चहा घेते. १९५६ च्या पहिल्या सहामाहींत अमेरिकेला १.३४ कोटी पौंड चहा निर्यात करण्यांत आला होता. १९५७ च्या पहिल्या सहामाहींत मात्र १.१२ कोटी पौंड चहाच निर्यात करण्यांत आला. त्याचप्रमाणें ऑस्ट्रेलिआ, कॅनडा व इतर कांहीं युरोपीय देश ह्यांना करण्यांत येणाऱ्या निर्यातींतहि घट झालेली आहे. भारतामधील व्यापारी कांहीं तात्पुरता फायदा मिळविण्यासाठी खात्रीलायक असा उत्तम प्रतीचा चहा पाठविण्याऐवजीं कमी प्रतीचा चहा पाठवितात असें एक कारण सांगण्यांत येत आहे. तथापि, खरें कारण भारताच्या चहाला इतर देशांतील स्वस्त चहाची स्पर्धा होत आहे हें आहे. सीलोन, पाकिस्तान व इंडोनेशिआ ह्या भारताच्या प्रतिस्पर्ध्यांनीं आंतरराष्ट्रीय बाजारपेठांत आपल्या निर्यातीची वाढ केलेली दिसून येते. चहा निर्यात करून भारताला विदेशी हुंडणावळ मिळत असते. त्यामुळें सध्यांच्या परिस्थितींत तर चहाच्या निर्यातीमधील घट चिंताजनक झाली आहे.

**अमेरिकेंत तापसरीचा प्रसार**—आशिआंतील अनेक देशांत येऊन गेलेली शीततापाची साथ अमेरिकेंतहि पसरत आहे. गेल्या कांहीं दिवसांत आणखी ५०,००० माणसांना तापाची बाधा झाल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे. आतांपर्यंत सुमारें १ लाख लोक तापसरीनें पछाडले गेले.

## नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नाशिक

चेअरमन : प्रिन्सिपॉल श्री. गो. पुराणिक

मॅनेजर : सनातन ज. बूच

गेल्या अहवालांत नमूद केल्याप्रमाणें त्या वर्षाच्या अखेरीस बँकेचें कार्यक्षेत्र दहा तालुक्यांचें होतें आणि त्यांत बँकेच्या सहा शाखा आणि नाशिक येथील मुख्य कचेरी यांचा समावेश होता. अहवालसालीं १-१०-१९५६ पासून बँकेचें कार्यक्षेत्र वाढविण्यांत येऊन नांदगांव आणि येवला हे दोन तालुके त्यांत सामील करण्यांत आले आणि (१) नांदगांव (२) मनमाड (३) लासलगांव आणि (४) येवला येथें शाखा सुरू करण्यांत आल्या. त्यामुळें वर्षअखेरीस बँकेचें कार्यक्षेत्र जिल्ह्याच्या १३ तालुक्यांपैकी १२ तालुक्यांचें झालें. बँकेचें नाशिक ऑफिस धरून बँकेचीं ११ ऑफिसें जिल्ह्यांत यावर्षी काम करीत होतीं. हें वर्ष संपल्यानंतर ता. १-७-५७ रोजीं मालेगांव येथें बँकेनें आपली शाखा सुरू केली असून आज बँकेनें आपल्या कार्यक्षेत्रांत गिरणा सहकारी साखर कारखान्याशिवाय सारा जिल्हा आणला व आतां ती नाशिक जिल्ह्याची मध्यवर्ती बँक या नांवास सार्थ झाली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. मालेगांवांत बँकेनें आपली शाखा सुरू केली म्हणजे मुंबई राज्य सहकारी बँकेकडून या बँकेकडे नियमानें तिचा सारा व्यवहार म्हणजे सोसायट्यांच्या ठेवी व कर्जे आपल्याकडे वर्ग करून घेतल्या.

अहवालसालीं मुंबई सरकारनें रु. चार लाखांचे या बँकेचे शेअर्स खरेदी केले. रिझर्व्ह बँकेनेंहि सवलतीच्या दरानें रु. बारा लाखांचें कर्ज बँकेस दिलें त्यामुळें संलग्न असलेल्या सोसायट्यांच्या कर्जाच्या मागण्या बँक पुरवूं शकली. गुदस्तसालीं बँक थकबाकीचें प्रमाण १४% होतें तें या सालअखेरीस १२% राहिलें असून बँकेची थकबाकी कांहीं प्रमाणांत कमी झाली आहे.

बँकेस ३०-६-१९५७ अखेर रु. २१,११९ रु. चा नफा झालेला आहे. सालगुदस्त बँकेस रु. १२,८९५ ची तूट आली होती. ती सर्व भरून काढून अहवालसालीं बँकेनें ८,२२४ रु. नफा करून प्रगतिपथावर पाऊल टाकलें आहे.

भांडवल पुरविण्याची बँकेची जबाबदारी दिवसेंदिवस वाढत आहे. बागाईत भागांतील आणि विशेषकरून सहकारी साखर कारखान्यांचे भागांतील सोसायट्यांच्या सभासदांच्या शेतीच्या गरजा वाढत आहे. त्या भागविण्यासाठी बँकेस वाढत्या प्रमाणांत कर्जाचा पुरवठा करणें अनिवार्य होणार आहे. म्हणून बँकेचें भांडवल आणि त्यायोगें तिची रिझर्व बँकेकडून जास्त कर्ज घेण्याची पात्रता वाढविणें आतां अत्यंत आवश्यक झालें आहे. म्हणून बँकेचें शेअर भांडवल झपाट्यानें वाढविण्यासाठी जिल्ह्यांतील जनतेनें आणि सहकारी सोसायट्यांनीं स्वयंस्फूर्तीनें हातभार लावावा.

बँकेकडून शेतकी सोसायट्यांच्या सभासदांना दैनंदिन वाढत्या प्रमाणांत शेतकी कर्ज दिलें जात आहे, परंतु सभासद आपला शेतीचा माल सहकारी संस्थेमार्फत त्या प्रमाणांत विकीत नाहींत. कर्जपुरवठा आणि मालविक्री यांची सांगड घातल्याशिवाय शेतकी कर्जाचें कार्य यशस्वी होण्याची शक्यता नसल्याचें सर्व सहकार तज्ज्ञाचें मत आहे. म्हणून निदान जेथें कार्यक्षम सहकारी खरेदीविक्री करणारी संस्था असेल तेथें कर्जपुरवठ्याची मालविक्रीशीं सांगड घालण्याची योजना सुरू करण्याच्या दिशेनें सहकारी कार्यकर्त्यांनीं निश्चित स्वरूपाचें पाऊल टाकणें अत्यंत आवश्यक झालें आहे.

उद्यम मासिकाचा
सुगंध विशेषांक
दिवाळीच्या शुभमुहूर्तावर प्रसिद्ध होईल.
'सुगंध विशेषांकां'त नैसर्गिक तसेच कृत्रिम सुगंध व ते तयार करण्याची विस्तृत सचित्र माहिती देण्यांत येईल.
आजच 'उद्यम' चीं वार्षिक वर्गणी रु. ६ पाठवून वर्गणीदार झाल्यास दिवाळीचा
'सुगंध विशेषांक'
व इतर अंक वर्षभर आपणांला मिळतील.
'उद्यम' मासिक, धर्मपेठ, नागपूर १.

## जनता सहकारी बँक लि., पुणें

चेअरमन : मा. ग. दीक्षित

मॅ. डायरेक्टर : वृ. शं. जमदग्नि

वर्षअखेर एकंदर सभासद ४९७ असून भाग भांडवल रु. ४८,४२५ आहे. १९५५-५६ सालीं हे आंकडे अनुक्रमें ४५२ आणि ४३,९०० असे होते. बँकेचें एकंदर खेळतें भांडवल ३० जून १९५७ अखेर ७,८८,७७३ रुपये आहे. १९५५-५६ सालापेक्षा हें भांडवल रु. १,९२,९०३ नें वाढलें आहे.

३० जून, १९५७ अखेर बँकेकडील रोख, इतर बँकांतील शिल्लक व इतर रोख्यांतील गुंतवणूक ५,०३,२२५ रुपये आहे. या रकमेचें एकंदर ठेवीशीं ६३ टक्के प्रमाण पडतें. सभासदांना विविध तारणांवर व नाममात्र सभासदांना सोनेंगहाणावर कर्जे देऊन त्यांच्या आर्थिक गरजा भागविण्याचा प्रयत्न बँक करीत आहे. ३०-६-५७ अखेर विविध तारणांवर दिलेल्या कर्जाचा आंकडा २,३७,६३९ रुपये आहे. कर्जाची वसुली व्यवस्थित होत आहे. ३० जून, १९५७ अखेर हुंडी व्यवहारांत गुंतविलेली रक्कम १३,९५८ रु. आहे.

सभासदांना आपल्या प्राप्तीपैकी कांहीं भाग शिल्लक टाकतां यावा म्हणून बँकेनें विविध योजना आंखल्या आहेत. मासिक पगारांतून कांहीं रक्कम शिल्लक टाकणारी एक नवी योजना सरकारी कर्जरोखे हप्त्यानें विकत घेण्याकरितां आंखली जात आहे. व्यापारी बँकांच्या पद्धतीवर ही बँक ग्राहकांना सर्व प्रकारच्या बँकिंगविषयक सोयी उपलब्ध करून देते. बचतीची संवय लागावी म्हणून ज्याप्रमाणें विविध योजना आंखल्या जात आहेत त्याचप्रमाणें सांगली, कोल्हापूर, नगर, कराड, मालेगांव, मुंबई, नागपूर, बेळगांव, कोपरगांव, नाशिक व इतर शहरांतील बँकांवर माफक दरानें ड्राफ्ट देण्याची व्यवस्थाहि बँकेनें केली आहे.

अहवालाचे वर्षी शिवाजीनगर येथें बँकेची शाखा काढण्याचा उपक्रम केला असून सदर शाखेचें उद्घाटन त्यावेळेचे सहकारी खात्याचे रजिस्ट्रार मा. राणा यांचे हस्तें दि. ३ फेब्रुआरी, १९५७ रोजीं झालें. दरवर्षाप्रमाणें यंदाहि बँकेच्या वाढदिवसानिमित्त व लक्ष्मीपूजनानिमित्त पानसुपारीचा कार्यक्रम अत्यंत यशस्वी रीतीनें पार पडला. बँकिंग पद्धतीस अनुसरून जरूर ती तरतूद केल्यानंतर वर्षअखेर निव्वळ नफा रु. ३,००० झाला आहे.

## दि इचलकरंजी अर्बन-को ऑपरेटिव्ह बँक लि., इचलकरंजी

चेअरमन : यशवंत विठ्ठल दातार
मॅनेजर : दौलतराव रामजी काळे

मागील वर्षाचे अखेरीस शेअर भांडवल रु. १,२२,७०० होतें तें यावर्षी रु. १,२७,३५०/– झालें आहे. एकूण फंडाची रक्कम रु. २,१७,००९ होती ती रु. २,२८,६६६ झाली आहे. अशा रीतीनें बँकेचें स्वतःचें भांडवल रु. ३,३९,७०९ होतें, तें वाढून रु. ३,५६,०१६ झालें आहे. बँकेस दिवसेंदिवस जनतेचा वाढता विश्वास लाभत आहे, हें पुढील आंकड्यांवरून निदर्शनास येईल. मागील वर्षी एकूण ठेवी रु. २४,७९,५६१ होत्या त्या या वर्षाचे अखेरीस रु. २५,७०,७५९ झाल्या आहेत. एकूण ठेवींचे रकमेंत गतसालपेक्षा सरसालांत रु. ९१,१९८ ची वाढ आहे. मागील वर्षअखेर खेळतें भांडवल रु. २९,०५,६७४ होतें. या वर्षअखेरीस तें रु. ३०,२७,७१८ झालें आहे. चालू सालीं एकूण येणें बाकी रु. ११,३०,९९५ आहे. येणें बाकीशीं थकबाकीचें प्रमाण १८·८ आहे. गतसालीं २१·७ होतें. बँकेची सांपत्तिक स्थिति चांगली असून बँकेनें सहकारी कायद्याप्रमाणें लागणारें तरतें भांडवल नेहमीं योग्य प्रमाणांत ठेवलें आहे. ऑडिटरनीं बँकेस 'अ' वर्ग दिला आहे. निरनिराळ्या कारणांनीं लांबणीवर पडलेला बँकेचा रौप्यमहोत्सव समारंभ ता. २०।५।५७ रोजीं मुंबई राज्याचे मुख्य मंत्री नामदार यशवंतरावजी चव्हाण यांचे हस्तें साजरा करणेंत आला. याप्रसंगीं बँकेच्या २५ वर्षांची "वाटचाल" या पुस्तिकेचें प्रकाशनहि अध्यक्षांचे हस्तेंच करणेंत आलें. आजरा शाखेचा व्यवहार बरा झाला आहे. अहवालाचे वर्षी बँकेस २९,०७१ रु. नफा झाला.

---

## श्री महावीर को–ऑप. बँक लि., कोल्हापूर

प्रेसिडेंट : गंगाराम सिद्दाप्पा चौगुले
मॅ. डायरेक्टर. दत्तात्रय भाऊ वागवडे

गुदस्त सालअखेर बँकेचे ११६८ सभासद होते. या सालीं एकूण १३७ सभासद झाले असून त्यांपैकीं 'ब' वर्गाचे ८८ सभासद झाले आहेत. मागील सालअखेर बँकेचे रु. ७२,१७० चें शेअर भांडवल होतें या सालीं नवीन शेअर ७७ विकले असून सालअखेर बँकेचें रु. ७२,९४० चें भांडवल झालेलें आहे.

मागील सालअखेर बँकेकडे चालू रु. ६,२५,०५०–६–२ च्या ठेवी होत्या. चालू वर्षी एकूण ठेवी रु. ५,५६,६८२–८२ च्या झाल्या आहेत.

गेल्या सालअखेर सभासदांकडे कर्जे रु. ३,८५,२९६–११–६ होतें. तें चालू सालअखेर रु. ४,६६,१००–४२ येणें आहे. वरील कर्जामध्यें तारणाची रु. ३,४९,१२१–७५ चीं कर्जे असून बिगर-तारणाचीं जामिनावर कर्जे रु. १,१६,९७८–६७ आहेत. बँकेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें योग्य तारण घेऊन सभासदांना कर्ज देणेचें धोरण ठेवलें आहे व बँकेचें तरतें भांडवलहि योग्य प्रमाणांत ठेवलें आहे. गेल्या वर्षी थकबाकी रु. २९,२०१–०–९ होती ती सालअखेर रु. २८,०६६–०५ ची आहे. चालू वर्षी नवीन थकबाकी झालेली नाहीं. थकबाकीचें कर्जाशीं प्रमाण ६·२ टक्के पडतें.

रिपोर्टाचे सालअखेरीस रु. ८,८७४–०१ नफा झाला आहे.

---

## दि तासगांव अर्बन को. बँक लि. तासगांव,

अध्यक्ष : तुकाराम वालचंद शहा,
मॅनेजर : एस्. बी. पाटील, (को. डिप्लोमा) जी. डी. सी. ए.

अहवालाचे सालांत सभासदांत १३ व नाममात्र सभासदांत २९ नीं वाढ झाली आहे. अहवालाचे सालांत बँकेचें शेअर भांडवल रु. ८३० व रिझर्व फंड इत्यादि रु. २९७५ नीं वाढलें आहेत. बँकेकडे असलेल्या सर्व प्रकारच्या ठेवींत अहवालाच्या सालांत रु. ७६,२२० नें वाढ झाली. गेले विजया दशमीपासून बँकेनें 'होम सेव्हिंग्ज' योजना सुरू केली असून त्याचा फायदा जवळ जवळ २५० खातेदार आहेत.

गेले वर्षापेक्षा चालू सालीं रु. ९८,९०५ एकूण कर्जीत वाढ झाली आहे. बाबवार आंकडे लक्षांत घेतां सोनें गहाण व माल तारण कर्जीत मोठ्या प्रमाणांत वाढ झाल्याचें दिसून येईल. साधे व कॅश क्रेडिट कर्जांत त्या मानानें कमी वाढ झाल्याचें दिसून येईल. होम सेव्हिंग्ज ठेवींचे तारणावर कर्ज देण्याची बँकेनें अहवालाचे सालींच सुरुवात केली आहे. बँकेनें हुंडी–व्यवहार मोठ्या प्रमाणावर केला आहे. इमारतीचें बांधकाम जवळ जवळ पुरें होत आलें आहे २–३ महिन्यांचे आंत इमारतीचें रीतसर बँकेला साजेशा थाटांत उद्घाटन करून बँकेचे व्यवहार स्वतःचे इमारतींत सुरू करणेचा मानस आहे.

अहवालाचे सालामध्यें हुंड्या, चेक्स व इतर बिलें यांच्या खरेदी-विक्री वसुलीचे व्यवहारांत बँकेस निव्वळ रु. ३,४७४ कमिशन मिळालें. सालगुदस्तपेक्षा सदर कमिशन रु. ७२६ नीं वाढलेचें दिसून येईल. विशेषतः अहवालाचे सालांत एकाच दिवशीं रु. ४४ इतकें कमिशन रोख वसूल झालें. आतांपर्यंत बँकेस एकाच दिवशीं इतकें रोख कमिशन कधींच वसूल मिळालेलें नव्हतें. अहवालाचे सालांत बँकेस रु. ८०८२ निव्वळ नफा झाला.

सन १९६१ सालीं आपल्या बँकेस २५ वर्षे पुरीं होत आहेत. सदर सालीं आपल्या बँकेचा "रौप्यमहोत्सव" साजरा करणेचा असलेनें रौप्यमहोत्सव निधी काढणेस चालू वर्षी सुरवात केली आहे.

---

## दि इस्लामपूर अर्बन को. बँक लि. इस्लामपूर

चेअरमन : गोपाळ लक्ष्मण फडणीस, बी. ए. एलएल्. बी.
सेक्रेटरी : के. डी. बोरकर,

चालू सालीं मेंबर संख्या नवीन आठ सभासद दाखल झाल्यामुळें २५५ झाली आहे. शेअर भांडवलहि रुपये २५,७३० वरून रु. २५,९७५ वर गेलें. ठेवींतहि समाधानकारक वाढ झाली असोन त्या रु. १,०८,५४३ वरून रु. १,२७,३६७ इतक्या झाल्या आहेत. मागील सालापेक्षा रिपोर्टाचे सालीं खेळत्या भांडवलांत रु. ३०,००० ची वाढ होऊन ते आतां दोन लाखांपर्यंत वाढलें आहे. रिपोर्टाचे सालीं एकूण येणें कर्जे रु. १,१२,८२९ ची असून त्यापैकीं थकलेली बाकी रु. २९,७१६ आहे. रिपोर्टाचे सालीं बँकेनें पोटनियम मंजूर करून घेऊन सोन्याचे जिन्नसाचे तारणावर कर्जाऊ रकमा देण्याचा नवीन उपक्रम सुरू केला. या उपक्रमामुळें जनतेची चांगली सोय असल्याचें अनुभवास आलें. साल अखेर यावर रु. ६७८६ दिलें गेलें आहेत. रिपोर्टाचे सालीं बँकेस निव्वळ नफा रु. २००२–४६ झाला.

---

## तुमचें स्थान कोणतें ?

### ( श्री. श्री. वा. काळे ह्यांचें नवें पुस्तक )

श्री. श्री. वा. काळे, संपादक "अर्थ" ह्यांचें हें नवें पुस्तक दिवाळीचे मुहूर्तावर प्रसिद्ध होणार आहे. श्री. काळे ह्यांचें कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील हें तिसरें पुस्तक होय. "कण आणि क्षण" च्या दोन आवृत्त्या निघाल्या असून त्याच्या गुजराती अनुवादाच्याहि दोन आवृत्त्या निघाल्या आहेत. "पुढें पाऊल" गेल्या वर्षी प्रसिद्ध झालें; त्याचाहि गुजराती अनुवाद लवकरच प्रसिद्ध होणार आहे. श्री. काळे ह्यांचे लेख आतां गुजराती व हिंदी मासिकांतूनहि प्रसिद्ध होऊं लागले आहेत. "तुमचें स्थान कोणतें ?" ह्या पुस्तकाचें मुखपृष्ठ विशेष अर्थपूर्ण होणार आहे. पृष्ठसंख्या १२० असून किंमत २ रुपये आहे.

---

### शेड्यूल्ड व बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या

| | शेड्यूल्ड बँका | | | | बिगर शेड्यूल्ड बँका | सर्व बँका |
|---|---|---|---|---|---|---|
| | स्टेट बँक | एक्स्चेंज बँका | इतर शेड्यूल्ड बँका | एकूण | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ६ |
| | | | भारत व | ब्रह्मदेश | | |
| १९३८ | ३५८ | ९३ | ६७७ | १,१२८ | ३४३ | १,४७१ |
| १९३९ | ३८१ | ९९ | ७९८ | १,२७८ | ६७३ | १,९५१ |
| १९४० | ३९० | १०१ | ८६० | १,३५१ | ८११ | २,१६२ |
| १९४१ | ४०१ | ९९ | ९५४ | १,४५४ | १,०१४ | २,४६८ |
| | | | अखंड भारत | | | |
| १९४२ | ३९२ | ८२ | ९७४ | १,४४८ | १.२६० | २,७०८ |
| १९४३ | ३९८ | ८४ | १,४०० | १,८८२ | १,५३१ | ३,४१३ |
| १९४४ | ४१९ | ७९ | १,९७७ | २,४७५ | १,९८५ | ४,४६० |
| १९४५ | ४२६ | ७७ | २,४५४ | २,९५७ | २,३७८ | ५,३३५ |
| | | | स्वतंत्र भारत | | | |
| १९४६ | ३५८ | ५८ | २,४४१ | २,८५७ | २,०२९ | ४,८८६ |
| १९४७ | ३६२ | ६० | २,५६५ | २,९८७ | १,८३२ | ४,८१९ |
| १९४८ | ३६७ | ६२ | २,५३४ | २,९६३ | १,७११ | ४,६७४ |
| १९४९ | ३७७ | ६४ | २,४११ | २.८५२ | १,५८९ | ४,४४१ |
| १९५० | ३८२ | ६२ | २,३३५ | २,७७९ | १,५७४ | ४,३५३ |
| १९५१ | ३९१ | ६१ | २,१९४ | २,६४६ | १,४७३ | ४,११९ |
| १९५२ | ४०८ | ६१ | २,२०२ | २,६७१ | १,३६९ | ४,०४० |
| १९५३ | ४२२ | ६३ | २,१८५ | २,६७० | १,३५१ | ४,०२१ |
| १९५४ | ४५३ | ६३ | २,२३० | २,७४६ | १,२८६ | ४,०३२ |
| १९५५ | ४८० | ६४ | २,२९४ | २,८३८ | १,२४७ | ४,०८५ |
| १९५६ | ५३६ | ६५ | २,३५० | २,९५१ | १,२४१ | ४,१९२ |

**इंडिअन आयर्न अँड स्टील कंपनी**—इंडिअन आयर्न अँड स्टील कंपनीच्या विस्ताराचा कार्यक्रम पुरा झाल्यावर कारखाना ८०,००० टन पोलाद निर्माण करूं शकेल. १९५३ सालीं केलेल्या अंदाजाप्रमाणें पोलादाचें उत्पादन ७०,००० टनापर्यंत जाईल अशी अपेक्षा होती. विस्ताराचा कार्यक्रम दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा भाग म्हणून भारत सरकारच्या सूचनेप्रमाणें हातीं घेण्यांत आला आहे.




'अर्थ' ग्रन्थमाला
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
१ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार






# दि बेळगांव बँक लिमिटेड

(शेड्यूल्ड बँक)

गेलीं २७ वर्षें सतत प्रगतिपथावर असलेली व ठेवीदारांच्या वाढत्या विश्वासास पात्र असलेली बँक.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ... | रु. २,८७,००० |
| ठेवी | ... | रु. १ कोटी १० लाखांचे वर |
| खेळतें भांडवल | ... | रु. १ कोटी ४० लाखांचे वर |

खालील वाढलेल्या दरानें ठेवी स्वीकारण्यांत येतात.

| | | |
|---|---|---|
| १ व २ वर्षें मुदत | द. द. शें. | ३ टक्के |
| ३ " " | " | ३। " |
| ४ " " | " | ३॥ " |
| ५ " " | " | ४ " |
| सेव्हिंग्ज बँक | " | २ " |
| होम सेव्हिंग्ज बँक | " | २½ " |

याशिवाय दरमहा नियमित बचत करण्यासाठीं क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटची आकर्षक योजना गेलीं ९ वर्षें सुरू असून ती चांगलीच लोकप्रिय झालेली आहे. या योजनेंत ३८ महिन्यांनंतर व्याजासह रक्कम परत मिळते.

दरसाल दर शेंकडा ४ टक्के दराचीं पंचवार्षिक कॅश-सर्टिफिकेटसहि दिलीं जातात.

बँकेच्या मुख्य कचेरीच्या इमारतींत अद्ययावत् सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय आहे.

विशेष माहितीसाठी समक्ष चौकशी करावी.

रविवार पेठ, बेळगांव.

एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर

स्थापना सन १९३५ टे. नं. २६२५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १

(१९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली)

| | |
|---|---|
| संकलित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० " |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० " |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. भगवंतराव नामदेवराव ढोबळे, (अध्यक्ष)
श्री. गेनुभाऊ गोविंदराव ढोले, (उपाध्यक्ष)
श्री. उमाकांत भाऊराव तांबे, (ऑ. मॅ. डायरेक्टर)
श्री. मल्हारराव बाबुराव वेंडे, (ऑ. ट्रेझरर)
श्री. आनंदराव पांडुजी ढोरे सभासद
श्री. मळीबुवा मार्तंड वामन "
श्री. गेनुजी लक्ष्मण नलवडे "
श्री. ज्ञानेश मारुतीराव मनसुख "
श्री. मनोहर रामजी नेहरकर "

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी:—लट्टे रोड, कोल्हापूर

—शाखा—

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

♣

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २०,२२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,७१,५०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,६२,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. के. ए. चौगुले, बी. ए., एलएल्. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. एम्. बी. चौगुले, शाहुपुरी—कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी. मॅनेजर.

स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[शेड्यूल्ड बँक]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३०-६-५७ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | २०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ३,०३,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,२५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर:

| १ वर्ष ते दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|
| रु. ३-०-० | रु. ३-४-० | रु. ३-८-० |

व्हा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २-०-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २-८-० |
| चालू डिपॉझिट | " | ०-८-० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेंत समक्ष मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६५,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

# बँक ऑफ पूना, लिमिटेड

—शेड्यूल्ड बँक—

- धंदा लहान असो अगर मोठ्या प्रमाणावर असो, पैशाची जरुरी सर्वांना भासते. बँकेकडून योग्य तारणावर कर्ज मिळूं शकतें.
- तसेंच, बँक अल्प मुदतीच्या ठेवी स्वीकारते.
- व्याजाचा दराबद्दल अगर माहितीकरितां मुख्य ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांना भेटावें अगर लिहावें.

—शाखा—

(१) सदाशिव पेठ, पुणें.
(२) ५४ डेक्कन जिमखाना, पुणें ४.
(३) सांगली.

मुख्य ऑफिसः—
४५५ रविवार पेठ, पुणें २.

गो. गं. साठे
मॅनेजर

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. | श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी | श्री. बा. ग. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय् एस्. जोशी
मॅनेजर.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : २४८३.

## सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यावरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींचे दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१–७–५७

बा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.